भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०३/२०१७

१) फार्मसीचे कॉऊटर मधिल,दुकानातील पैसाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २३/०३/२०१७ चे २१.३० वा. ते दिनांक २४/०३/२०१७ चे ०७.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी विनोद वासुदेव सवालाखे वय ४१ वर्ष, रा. राजेंद्र वार्ड मोहाडी नेआपली फार्मसी बंदकरून घरी गेले व दुसऱ्या दिवशी शेजाऱ्याने दुकान फोडले असल्याचेसांगीतल्याने तिथे जावुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन समोरील शटरचे ताले तोडुन शटर वर उचलुन आत प्रवेश करून दुकानातील कॉऊटरचे ड्रॉप मधील वसुलीचे रक्कम २,६०,०००/रू. ठेवलेले चोरूने तसेच, विनोद वाडीभस्मे यांचे दुकानाचे समोरील शटरचे ताले तोडुन वर करून आत प्रवेश करून त्याचे दुकानातुन १९,०००/रू.व चुद्रशेखर यांचे दुकानातुन २,५००/रू. असा एकुन २,८१,५००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

२)शासकीय कामात अडथळा निर्मान करून अश्लिल शब्दात बोलुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २४/०३/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी बाबा छौलत चोपकर वय ५७ वर्ष रा. विनोबनगर तुमसर हे शासकीय कामाने खडकी ते डोंगरगाव रोड ने आपले करडी वनक्षेत्रात कर्तव्यावर जात असतांनी यातील आरोपी फिर्यादीस माझी पत्नी वन समिती खडकी येथे अध्यक्ष होती पण तुमच्या कारणमुळे माझी पत्नीवर गावकऱ्यांनी (समितीने) अविश्वास आणल्याने माझ्या पत्नीचे पद रदद होणार आहे असे म्हणुने फिर्यादीस शासकीय काम करण्यास अडथळा निर्मान करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३५३,१८६,२९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.नंदेश्वर पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

३) शुल्लक कारणावरून भांडन शिवीगाळ करून दगड मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २३/०३/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी राजन नत्थुजी बोरकर वय ४८ वर्ष रा. इंदीरा गांधी वार्ड भंडारो हे लोकेशे लिमजे यांचे पानठेल्यात खर्रा घेण्यास गेला असतांना त्या ठिकाणी यातील आरोपी येवुन फिर्यादीची विनाकारण हाशी मजाके व शिवीगाळ करून दुकानासमोरील रोडावर दगड उचलुन फिर्यादीचे डोक्याचे मागील बाजुस मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) मोटार सायकल चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन एकाचे मरणास व दोन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल क्र.एमएच ४० एस. २५०९ चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन त्याने आपली साईड सोडुन रॉग साईडला मोटार सायकल नेवुन विरूद्ध दिशेने येणाऱ्या मृतकचे पॅशन प्रो दुचाकी वाहन क्र. एमएच ३५ आय ५७६९ ला जबर धडक देवुन अपघात करून पॅशन प्लस मोटार सायकल चालक लिलाधर माधवराव वाहीकर वय ५० वर्ष रा. निलज याचे मरणास तसेच त्यावर बसुन असलेल्या दोन महिलांना जखमी करण्यास व स्वता: आरोपी हा जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने प्रत्यक्षदर्शी फिर्यादी साक्षीदाराचे बयानावरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) संगनमत करून विनयभंग ,जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २३/०३/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही तीचे आई वडील ,बहीनीसह तीचा अवैधरित्या रेतीची वाहतुक करतांना महसुल विभागाने जप्त केलेला ट्रक क्र. एमएच ४० एके ७५५८ हा सोडविण्या करिता मा. न्यायालयाचे आदेश घेवुन आरोपी यांचे कार्यालयात गेले असता आरोपीने तीचा हाथ पकडुन विनयभंग करून तसेच आरोपी क्र. २ मुलगा याने बॅडमिटनचे रॉकेट तीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,३२३,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि.गिते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.